# सुचना

**विषय : वैद्यकीय अधिकारी एनयुएचएम, शित साखळी तंत्रज्ञ, औषध निर्माता, स्टाफ नर्स व लेखापाल सेवेच्या पदभरतीबाबत.**

**संदर्भ** : दैनिक लोकमत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात दि.११/०१/२०२२.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत वैद्यकीय अधिकारी एनयुएचएम, शित साखळी तंत्रज्ञ, औषध निर्माता, स्टाफ नर्स व लेखापाल सेवेसाठी दि.११/०१/२०२२ रोजी दैनिक लोकमत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन उपरोक्त सेवेसाठी दि.१९/०१/२०२२ अर्ज स्वीकृतीसाठी मुदत देण्यात आली होती.

उपरोक्त सेवेसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची पडताळणी करुन प्रथम पात्र/अपात्र यादी दि.०५/०४/२०२२ रोजी जिल्हा परिषद, औरंगाबाद कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन अपात्र उमेदवारांना आक्षेप असल्यास दि.११/०४/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) जिल्हा कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन अपात्रतेच्या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या नावे लेखी स्वरुपात अर्ज करुन त्या सोबत पात्रतेसाठी दस्ताऐवज सादर करणेबाबत कळविले होते.

त्यानुसार उपरोक्त सेवेसाठी प्राप्त झालेल्या आक्षेपाची पुर्तता करुन अंतीम पात्र/अपात्र यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

तसेच वैद्यकीय अधिकारी एनयुएचएम, शित साखळी तंत्रज्ञ, औषध निर्माता, स्टाफ नर्स व लेखापाल सेवेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पदभरती प्रक्रिया खालील बाबींच्या अनुषंगाने पुर्ण करण्यात येईल.

१. वैद्यकीय अधिकारी एनयुएचएम सेवा वगळता शित साखळी तंत्रज्ञ, औषध निर्माता, स्टाफ नर्स व लेखापाल सेवेसाठी कौशल्य चाचणी घेण्यात येईल. याबाबत वेळापत्रक जिल्हा परिषद, औरंगाबाद कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल.
२. कौशल्य चाचणीमध्ये निकषानुसार समाधानकारक कामगिरी असणाऱ्या उमेदवारांची पुढील प्रक्रियेसाठी निवड करण्यात येईल.
३. तद्नंतर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या निवड निकषाच्या अनुषंगाने गुणानुक्रमे यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

6.5.22

**D : NHM2018/Establishment/Recruitment/Letters of Recruitment 2022**